# जैविक कीड नियंत्रण प्रयोगशाळा यवतमाळ

गार्डन रोड  यवतमाळ
Email- bpclyavatmal@rediffmail.com/ bpclytl@gmail.com
फ़ोन  ०७२३२०२४२४००

---

सन 2002 मध्ये केंद्र पुरस्कृत  कापुस तंत्रज्ञान अभियान अंतर्गत जैविक किड नियंत्रण प्रयोगशाळेची स्थापना झाली आहे.  यवतमाळ व्यतिरीक्त महाराष्ट्रात 1.अहील्यानगर 2.ममुराबाद (जळगांव) 3.धुळे 4.छत्रपती संभाजीनगर 5.परभणी    6. धनेगांव (नांदेड) 7.अमरावती 8.बुलढाणा 9.सेलू(वर्धा) इ ठिकाणी जैविक किड नियंत्रण प्रयोगशाळा स्थापण झाल्या आहेत.

**<u>जैविक खते म्हणजे काय व त्यांच्या वापराचे फायदे</u>**

1. पिकांच्या उत्पादनात 7 ते 10 टकके पर्यत वाढ होते,
2. जैविक खतांनी जमिनीत सोडलेल्या संजीवकामुळे बियाण्यांची उगवण्शक्ती वाढते
3. जमिनीचा पोत सुधरतो
4. सेंद्रीय पदार्थ कुजण्यास मदत होते
5. नैसर्गीक पध्दतीने अन्नद्रव्याची उपलब्धता वाढते
6. उपयुक्त जीवजंतु व मित्र किडींना व जमिनीला कसलाही अपाय होत नाही,
7. जैविक खतांनी जमिनीत सोडलेल्या प्रति जैविक / रसायनामुळे पिकांची रोग व किड प्रतिकारक शक्ती वाढते
8. जमिनीची नैसर्गीक व जैविक सुपिकता टिकून राहते,
9. पर्यावरणचा समतोल राखला जातो,
10. जैविक खते अत्यंत कमी प्रमाणात लागतात. त्यामुळे रासायनिक खतांच्या तुलनेत त्यांच्या वापराचा खर्च अत्याल्प आहे.

**<u>जैविक खतांचे प्रकार</u>**

1.रायझोबीयम जिवाणू खते
ही जिवाणु खते / संवर्धने व्दीदल पिकांच्या मुळयावर सहजीवन पध्दतीने गाठी निर्माण करतात. या गाठीमध्ये जिवाणु दवारा  हवेतील नत्र पिकांना उपलब्ध होईल या स्वरूपात स्थिर केले जाते. दवीदल पिके या सहजीवन पध्दतीने 40 ते 250 किलो नत्र प्रति हेक्टर प्रति वर्ष स्थिरीकरण करतात.
ही खते तुर मुंग उडीद सोयाबीन भुईमुंग चवळी इ. दवीदल पिकांना उपयुक्त आहे.

2.अझोटोबॅक्टर जिवाणू खते
या खतातील जिवाणू स्वतंत्र पध्दतीने जमिनीत वाढतात. हे जीवाणू हवेतील नत्र शोषून घेउन जमिनीत 15 ते 50 किलो नत्र प्रति हेक्टर प्रति वर्ष स्थिर करतात. हे नत्र एकदल व तृणवर्गीय पिकांना उपयोगी पडतात. उदा. ज्वारी गहू बाजरी कपाशी भात इ.

3.स्फुरद विरघळविणारे जिवाणू खते
जमिनीत स्थिर झालेले स्फुरद ( फॉस्फरस ) हे पिकांना उपलब्ध होत नाही. अशा प्रकारचे अनुपलब्ध स्फुरद या प्रकारचे जिवाणू विरघळवून पिकांना उपलब्ध करून देतात. अशा पध्दतीने 15 ते 20 किलो स्फुरद पिकांना उपलब्ध होते.
4. पालाश उपलब्ध करणारे जिवाणू खते
महाराष्ट्रातील जमिनीत पालाश भरपुर असून त्यातील बहुतांश पालाश स्थिर झालेले आहे. जमिनीत स्थिर झालेले पालाश ( पोटॅश ) हे पिकांना उपलब्ध होत नाही. अशा प्रकारचे अनुपलब्ध पालाश या प्रकारचे जिवाणू विरघळवून पिकांना उपलब्ध करून देतात.

**<u>जिवाणू खते वापरण्याची पध्दत</u>**

1. बियाणे करीता - 10 किलो बियाण्यास 100 मिली जिवाणू संवर्धने बीज प्रक्रिया करताना वापरावीत.
2. रोपांकरीता – 100 लि पाण्यात 1 लि. जिवाणू संवर्धक मिसळावे व त्यात मुळया बुडवून लागवड करावे.
3. बेणे प्रक्रिया - 500 लि पाण्यात 1 लि. जिवाणू संवर्धक मिसळावे व त्यात बेणे बुडवून लागवड करावे.
4. जमिनीत शेणखतातून देणे – 400 ते 500 किलो शेणखतात 1 ली. जिवाणू संवर्धक मिसळावे व समप्रमाणात फेकून दयावे.
5. मुळया करीता - 200 लि पाण्यात 1 लि. जिवाणू संवर्धक मिसळावे व आळवणी करावी.
6. ठिबक दवारे – 1 एकर करीता 1 ली. जिवाणू संवर्धक दयावे.

**<u>उत्पादन</u>**

| **अ.क्र.** | **जैविक खताचे नाव** | **लक्षांक लि.** सन (२०२४-२५) | **उत्पादन लि.** सन (२०२४-२५) | **शेरा** |
|---|---|---|---|---|
| 1 | द्रवरूप रायझोबियम जिवाणू संघ (सोयाबीन ) | 3255 | 3255 | |
| 2 | द्रवरूप रायझोबियम जिवाणू संघ (तूर ,मुंग ,उडीद इ ) | 950 | 950 | |
| 3 | द्रवरूप रायझोबियम जिवाणू संघ (हरभरा ) | 4400 | 4400 | |
| 4 | द्रवरूप अझोटोबॅक्टर जिवाणू संघ | 310 | 310 | |

**<u>उपलब्धता</u>**

सर्व जिवाणू संघ खते हे 250 मिली बॉटल साइझ मध्ये लागवड हंगामात उपलब्धा असतात. विक्री किमंत प्रति बॉटल (250 मिली) रू.110/- आहे.

किरकोळ विक्री प्रयोगशाळेत स.11 ते सं. 5 या वेळेत उपलब्धतेनुसार असेल. (शासकिय सुटीचे दिवस वगळून).

संपर्क –
1.श्री.ऋषीकेश जिडडेवार (9403260806)
कृषि पर्यवेक्षक
2. श्री.वेंकटरेडडी कुंटावार (9422923826)
तंत्र अधिकारी,
जैविक कीड नियंत्रण प्रयोगशाळा,
गार्डन रोड, यवतमाळ 445001